MHKO110000102026

# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१२/२०२६.

(CNR No.**MHKO110000102026**)

## निशाणी क्र. ०१ खालील आदेश.

(गुन्हा रजि. क्र. ६६४/२०२५ वडगांव पोलीस ठाणे)

०१. अर्जदार – कृष्णात संभाजी संकपाळ, यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे पेठवडगांव पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र.६६४/२०२५, या गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल त्यांना परत मिळण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांच्या कथनांनुसार, दिनांक २३/१२/२०२५ रोजी मच्छिंद्र बोबडे हे अर्जदार यांच्या मालकीचे चांदीचे दागिने, एकूण वजन ०.०६९ कि.ग्रॅ. ज्याची अंदाजे किंमत रु.०८,४१७/- तसेच सोन्याचे दागिने, एकूण वजन ४.८०० ग्रॅम, ज्याची अंदाजे किंमत रू.६५,५८२/- अशी असून, ते न्यू अंगडिया सर्व्हीसेस पार्सलने कोल्हापूरहून मुंबई येथे घेऊन जात असताना, आरोपींनी दरोडा टाकून सदरचे सोन्याचे व चांदीचे दागिने त्यांच्या ताब्यातून जबरदस्तीने काढून घेतली होती. त्या अनुषंगाने वडगांव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली होती. सदरचा मुद्देमाल हा वडागांव पोलीस ठाणे यांनी गुन्हा रजि. क्र. ६६४/२०२५ चे कामी जप्त केला आहे. सदरचा मुद्देमाल हा अर्जदार यांच्या मालकीचा असून तो पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास वातावरणातील बदलामुळे सदर चांदीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सदरचा मुद्देमाल हा अर्जदार यांचे व्यवसायिक चांदीचे दागिने असल्यामुळे सदरचा मुद्देमाल, योग्य त्या अटी व शर्तीवर अर्जदार यांनी त्यांच्या ताब्यात मिळण्याची विनंती केली आहे.

०३. तपासी अधिकारी यांनी **निशाणी क्र.०४** वर त्यांचे म्हणणे सादर करून प्रकरणाची चौकशी अद्यापही अपुरी असल्यामुळे सदरचा मुद्देमाल अर्जदार यांना परत देण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे. तसेच सरकारी वकील यांनी **निशाणी क्र.०५** वर त्यांचे म्हणणे सादर करून सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्जदाराने **निशाणी क्र.०३** खाली, वडगांव पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र.६६४/२०२५ ची छायांकित प्रत, दागिने खरेदी केल्याची सत्याप्रीत प्रत तसेच, अर्जदार यांच्या आधारकार्डची सत्यापीत प्रत, हजर केली आहे. अर्जदार तर्फे दाखल करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांवरून, सदरचा मुद्देमाल हा अर्जदार यांच्या मालकीचा असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, अर्जदार हा सदर मुद्देमालाचा अंतरिम ताबा मिळण्यास पात्र असल्याचे दिसून येते.

०५. तसेच, **सुंदरभाई -वि- गुजरात ए.आय.आर. २००३ सर्वोच्च न्यायालय ६३८** यांच्या निकालानुसार, माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, पोलीस स्टेशन किंवा एखाद्या कार्यालयाचे आवार हे मुद्देमाल ठेवण्यासाठी योग्य ठिकाण नाही आणि दंडाधिकाऱ्यांना योग्य अटींवर मुद्देमाल सोडण्याचा अधिकार आहे. **सुंदरभाई देसाई** प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने केलेले निरीक्षण लक्षात घेऊन, जप्त केलेला मुद्देमाल विशिष्ट अटींवर आणि जामिनावर सोडणे योग्य आणि न्यायोचित आहे.

०६. तपासी अंमलदार व सरकारी वकील यांचे म्हणणे, अर्जदाराने दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता, प्रकरणातील जप्त मुद्देमाल हा अर्जदार याच्या मालकीचा असल्याचे दिसून येत आहे. तसेच, आजपर्यंत सदर मुद्देमालाची अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे, सदर मुद्देमाल अर्जदाराच्या ताब्यात देणे योग्य होईल. सदरची चांदी ही पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास अर्जदारांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, म्हणून मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे, वडगांव पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र.६६४/२०२५ चे कामी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल, म्हणजेच चांदीचे दागिने, एकूण वजन ०.०६९ कि.ग्रॅ. तसेच सोन्याचे दागिने, एकूण वजन ४.८०० ग्रॅम, हे अर्जदार – कृष्णात संभाजी संकपाळ, यांना रक्कम ₹ ०१,२०,०००/- (₹ एक लाख वीस हजार मात्र) च्या इन्डेंमनीटी बॉडवर (Indemnity Bond) पुढील अटी व शर्तीनुसार देण्यात येत आहे.

अ) अर्जदाराने सदर मुद्देमाल यात कुठलाही बदल करू नये.

ब) अर्जदाराने सदर मुद्देमाल विक्री, गहाण, भेट, बक्षीस इत्यादी कोणत्याही मार्गाने मुद्देमालाची विल्हेवाट लावू नये.

क) न्यायालय सांगेल त्यावेळेस मुद्देमाल न्यायालयासमक्ष हजर करावा.

ड) मुद्देमाल बेकायदेशीर कामासाठी वापरू नये.

३. सदरचा मुद्देमाल ताब्यात देताना तपासणी अंमलदाराने त्याच्याकडील असलेल्या

मुद्देमाल रजिस्टरचा उतारा दोषारोपपत्रात दाखल करावा.

४. सदर मुद्देमाल परत करताना तपासी अंमलदार यांनी मुद्देमालाची ३ रंगीत छायाचित्रे काढून ती या खटल्याच्या निकालापर्यंत जतन करून ठेवावीत.

५. सदरहु अर्ज दोषारोपासोबत जोडण्यात यावा.

६. येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2026.03.30 16:56:30 +0530

पेठ-वडगांव
दिनांक - ३०/०३/२०२६.

**( श्रीनिवास अ. कुलकर्णी )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव.
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.